सोमवार, १६ मार्च २०१५

तरुण भारत

## दोडामार्ग कॉलेजमध्ये वित्तीय क्षेत्रातील संधीबाबत मार्गदर्शन

**दोडामार्ग :** येथील हळबे महाविद्यालयातील करिअर गायडन्स व प्लेसमेंट सेलमार्फत कोमशाळा–द बँकिंग ॲकॅडमी म्हापसा गोवातर्फे विद्यार्थ्यांना बँकिंग व वित्तीय क्षेत्रातील संधीबाबत जागरुकतेचा कार्यक्रम घेण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील होते. त्यांनी विद्यार्थ्यांना बँकिंग व वित्तीय क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध होत असल्याने या मार्गदर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन केले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून केनेथ डिसा यांनी प्रोजेक्टरवर विद्यार्थ्यांना बँकिंग, वित्तीय क्षेत्रातील संधी यावर मार्गदर्शन केले. राष्ट्रीयकृत व खासगी बँका, सहकार क्षेत्रातील वित्तीय संस्थांचे जाळे आता रिझर्व्ह बँकेच्या नव्या धोरणानुसार खेड्यांपर्यंत विस्तारले जाणार असल्याने भारतात २० लाख रोजगार या क्षेत्रात निर्माण होणार आहे. विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कौशल्य आत्मसात करून क्षमता विकसित कराव्यात, असे आवाहन डिसा यांनी केले. यावेळी मेलविन जेरोम, रुपेश म्हावळींगकर उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. एम. टी. बेग तर आभार प्रा. एस. एस. पाडगावकर यांनी मानले.